| | |
|---|---|
| MHYA070016232025 | **नियमित दिवाणी दावा क्र. ७८/२०२५**<br>**सुरेश वि. महाराष्ट्र शासन व ईतर** |

**नियमित दिवाणी दावा क्र. ७८/२०२५ मधील**
**निशाणी क्र.०५ कडील अर्जावर आदेश**

सदर अर्ज वादीने प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक ०६/०६/२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या कार्यवाहीला व अंमलबजावणीला स्थगीती मिळण्याकरीता वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ अन्वये प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

**०२.** मौजा किन्ही, ता. आर्णी, जि. यवतमाळ येथील शेत गट क्र.४०, जुना शेत स क्रमांक १०१), क्षेत्रफळ ०२ हे ८२ आर पोट खराबासह निशाणी १ च्या परिच्छेद २ मधील नमूद चतुःसिमेतील मिळतीतुन तिन मिटर रूंदीचा रस्ता देण्याबाबत प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक ०६/०६/२०२५ रोजी आदेश पारित केले. सदर शेत जमीनीस यापुढे ‘वाद शेत जमीन’ व सदर आदेशास ‘वादीतीत आदेश’ म्हणून संबोधण्यात येत आहे.

**०३.** वादीचे दाव्यातील थोडक्यात कथन असे की, वाद मिळकत ही वादींच्या मालकी व ताबे वहिवाटीतील आहेत. प्रतिवादी क्र.३ यांनी दिनांक ०३/०३/२०२५ रोजीच्या अर्जान्वये किन्ही गावातील रस्ता वादीने मागील ५० वर्षापासून अडवुन ठेवला आहे. सदर रस्ता खुला करून देण्यात यावा अशी विनंती केली. जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. दिनांक २०/०५/२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी स्थळ निरीक्षण करून वाद शेतजमीनीमधून तिन मिटर रूंदीचा रस्ता मंजूर केला.

०४. वादीने पुढे असे कथन सादर केले की, प्रतिवादी क्र.१ यांनी पारित केलेला आदेश पूर्णपणे चुकीचा व बेकायदेशिर असून वादीचे कोणतेही म्हणणे लक्षात न घेता पारित केलेला आहे. सदर रस्त्याची मागणी कोणत्याही शेतकऱ्याकडुन झालेली नाही. वाद शेतजमीनीच्या पश्चीमेला असलेल्या शेत गट क्र. ३९ पासून मौजा किन्ही गावाची हद्द समाप्त तोते. सदर भागात किन्ही येथील शेतकऱ्यांच्या जमीनी देखील नाहीत. त्यामुळे किन्ही येथील शेतकऱ्यांना सदर रस्तयाची आवश्यकता नाही. मागील ५० वर्षापासून अशा कोणत्याही रस्त्याची मागणी कोणत्याही शेतकऱ्याने केली नाही. वाद शेतजमीनीच्या पश्चीमेला नाला व त्यापलीकडे गणपत कुडे यांची शेत गट क्र.३९ आहे. सदर शेताच्या पश्चीमेला जवळा किन्ही शिव व त्यानंतर मुजमुले यांचे शेत आहे. मुजमुले व गणपत कुडे यांच्या शेताच्या मधुन जवळा किन्ही शिव अंदाजे १२ ते १५ फुट रूंद आहे. सदर शिवेजवळ दक्षिणेकडे अंदाजे १२ ते १५ मिटर शेत गट क्र.३९ च्या दक्षिण हद्दीवरून पूर्व–पश्चिम शेत गट क्र. ४० व ३८ चा सामाईक धुरा आहे. सदर धुऱ्यावरून रस्ता दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. महाराष्ट्र जमीन महसुल संहिता कलम १४३ च्या तरतुदीप्रमाणे शेताच्या बांधावरून रस्ता उपलब्ध करून देता येतो परंतु शेताच्या मध्यभागातुन रस्ता देता येत नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी शेत गट क्र.४० च्या मध्यभागात तिन मिटर रुंदीचा रस्ता मजूर केला आहे. त्यामुळे वादीच्या शेताचे दोन भाग पडुन वादीचे अतोनात नुकसान होईल. करीता सदर आदेश रद्द करून मिळण्याकरीता वादीने प्रस्तुत दावा दाखल केला आहे.

०५. सदर दाव्यासोबत वादीने प्रस्तुत अर्ज तुर्तातुर्त मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. त्या अनुषंगाने वादीने असे म्हणणे सादर केले की, सदर आदेशाची अंमलबजावणी झाली तर वादीच्या शेताचे दोन तुकडे होतील त्यामुळे वादीच्या पिकांचे मोठे नुकसान होणार आहे. जर सदर आदेशाला स्थगीती मिळाली नाही तर वादीचे कधीही भरून न निघणारे नुकसान होईल. वादीच्या दाव्यामध्ये

महत्वाचे कायदेशिर मुद्दे आहेत. त्यामुळे सकृतदर्शनी केस वादीच्या बाजुची आहे. तसेच सोईस्कारतेचा तोल देखील वादीच्याच बाजुने आहे. करीता सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.१ यांनी पारित केलेल्या दिनांक ०६/०६/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणीस स्थगीती दयावी अशी विनंती वादीने केली.

**०६.** सदर अर्जाची नोटीस प्राप्त होवुन सर्व प्रतिवादी दाव्यात हजर झाले. प्रतिवादी क्र.१ यांनी विहीत मुदतीत लेखी जबाब दाखल केला नाही. करीता प्रस्तुत दावा व अनुषंगाने सदर अर्ज प्रतिवादी क्र.१ विरूध्द बिना लेखी जबाब व म्हणणे चालविण्यात यावा असा आदेश दिनांक ०६/०२/२०२६ रोजी पारित करण्यात आला. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी निशाणी १५ वर त्यांचा लेखी जबाब दाखल केला. निशाणी १६ वर पुरसिस दाखल करून लेखी जबाब हेच प्रस्तुत अर्जाचे म्हणणे वाचण्यात यावे असे न्यायालयास कळविले.

**०७.** प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी असे म्हणणे सादर केले की दिनांक ०६/०६/२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी पारित केलेला आदेश अगदी योग्य व सर्वोतोपरी विचार करून वादीस पुर्ण संधी देवून केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून किन्ही ते जवळा रस्ता हा प्रश्न प्रलंबित होता. वादीच्या शेताला लागून असलेल्या नाल्यापर्यंत रस्त्याचे खडीकरन झालेले आहे. परंतु वादी रस्ता देत नसल्यामुळे सदर रस्त्याचा प्रश्न प्रलंबित पडला होता. वादीच्या शेताला लागून असलेल्या नाल्यावर पुल मंजूर झाला आहे. दिनांक ०६/०६/२०२५ च्या आदेशान्वये मंजूर झालेल्या रस्त्यामुळे जवळा ते किन्ही हे अंतर एक ते दोन कि.मी ऐवढे होईल. सर्व गावकरी सदर रस्त्याचा वापर करणार आहेत. वादीचा दावा पूर्णपणे खोटा असून वादीला कोणतीही प्रथम दर्शनी केस नाही. जर अर्ज मंजूर झाला तर लोकांचे नुकसान होईल. वादी स्व्च्छ हाताने न्यायालयात आलेला नाही. करीता सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०८. सदर अर्ज व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस.एस. राठोड यांचा तसेच प्रतिवादी क्र. २ व ३ तर्फे विद्वान वकील श्री. एन.एस. जवके यांचा युक्तीवाद ऐकला.

०९. वादी व प्रतिवादी यांची कथने आणि कागदोपत्री पुरावा विचारात घेवुन प्रस्तुत अर्जाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होवुन त्याबाबतचे निष्कर्ष आणि कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नमुद करते आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी आपला दावा शाबीत करतात काय ? | **होकारार्थी** |
| २ | सोयीचा समतोल वादीच्या बाजुचा आहे काय? | **होकारार्थी** |
| ३ | मनाई नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | **होकारार्थी** |
| ४ | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

१०. वाद शेतजमीन वादीच्या ताबेवहिवाटीतील आहे. ही बाब प्रतिवादींनी देखील कुठेही नाकारलेली नाही. त्यामुळे वादातीत मिळकत ही वादीच्या मालकीची व वहीवाटीतील आहे हे निर्वीवाद आहे. वादीने असे म्हणणे सादर केले की, दिनांक ०६/०६/२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी पारित केलेल्या आदेशान्वये मंजूर झालेला तिन मिटर रूंदीचा रस्ता त्याच्या शेतजमीनीच्या मधोमध जात आहे. त्यामुळे त्याचे मोठे नुकसान होईल. याउलट प्रतिवादी यांनी सदर आदेश योग्य असल्याचे कथन केले आहे. सदर कथनांच्या अनुषंगाने अभिलेखावर दाखल असलेल्या दिनांक ०६/०६/२०२५ रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता सदर आदेशामध्ये असे नमूद आहे की वादीने पउल रस्ता कुठेही अडविला नाही. गट क्र.३८ व ३९

मधुन रस्ता घेतल्यास गट क्र. ४० मधुन सामाईक धुऱ्याने १० फुटाचा रस्ता देण्यास वादी तयार आहे. सदर आदेशामध्ये वाद शेतामधून गावठाणापर्यंत पाऊलवाट असल्याचे नमूद आहे. तसेच सदर रस्ता अरूंद व बैलगाडी व ईतर कृषी अवजारांकरीता अरूंद आहे. असे निष्कर्ष काढुण प्रतिवादी क्र.१ यांनी वादातीत मिळकतीतुन तिन मिटर रस्ता मंजूर केल्याचे सदर आदेशावरून दिसून येते. अभिलेखावर दाखल असलेल्या अर्जांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी सदर अर्ज ईतर गावकऱ्यांच्या स्वाक्षरीने दाखल केल्याचे दिसून येते. परंतु कोणत्याही शेतकऱ्याने वैयक्तीकरित्या रस्त्याची मागणी केल्याचे अभिलेखावर दाखल कागदपत्रांवरून दिसून येत नाही. तसेच, अनेक शेतकऱ्यांच्या नावापुढे जवळा या गावाचा उल्लेख असल्याचे दिसून येत आहे. म्हणजेच किन्ही येथील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्याकरीता त्यांनी रस्त्याची मागणी केली असे मला अभिलेखावरून दिसून येत नाही.

**११.** वादीच्या मागणीच्या अनुषंगाने स्थळ निरीक्षण अहवालासोबत दाखल असलेल्या स्थळदर्शक नकाशा पाहीला असता त्यामध्ये जवळा किन्ही रोडला लागून मुजमुले यांचे शेत गट क्र. ३९ असल्याचे दिसून येते. गावठाण व शेत गट क्र.३९ च्या मध्ये उत्तरेला रोड लगत वादी यांचे वाद शेत आहे. सदर शेताच्या मधुन पाउलवाट असल्याचे सदर नकाशात दाखविले आहे. सदर नकाशाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता सदरची पाउलवाट ही वादीच्या शेताच्या मधोमध जात असून त्यामुळे वादीच्या शेताचे दोन भाग पडलेले आहेत. दिनांक ०६/०६/२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये सदर पायवाटीवरून तिन मिटर रूंदीचा रस्ता मंजूर केला आहे. सदर पाउलवाटीचे मोजमाप स्थळ निरीक्षण अहवालात किंवा नकाशामध्ये नमूद केलेले नाही. वादीने धुऱ्यावरून दहा फुट जागा रस्त्यासाठी देण्यास तयार असल्याचे त्यांनी त्यांच्या दाव्यात देखील कथन केले आहे. महाराष्ट्र

जमीन महसुल संहिता कलम १४३ च्या प्राविधानाप्रमाणे शेताच्या मधातुन रस्ता देता येत नाही. सदर कलमामध्ये स्पष्ट प्राविधान आहे की रस्ता मंजूर करताना शेतकऱ्यांचे कमीत कमी नुकसान होईल व शेताच्या बांधावरून रस्ता मंजूर केला जाईल याची काळजी घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये गट क्र.३८ व वाद शेतजमीनीच्या धुऱ्यावरून पुढे गट क्र.३९ धुऱ्यावरून रस्ता मंजूर होण्यासारखी परिस्थीती असताना व वादी हे धुऱ्यापासून जमीन देण्यास तयार असताना वाद शेत जमीनीच्या मधुन जाणारा रस्ता प्रतिवादी क्र.१ यांनी मंजूर केल्याचे दिसून येते. सदर बाब ही प्रश्न उपस्थीत करणारी आहे. दिनांक ०६/०६/२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाल्यास वादीच्या मिळकतीचे दोन तुकडे होवून दोन्ही बाजुने पिकांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**१२.** वर नमूद केल्याप्रमाणे सदर आदेश वादीच्या मिळकतीस व त्याच्या मिळकतीच्या दर्जास नुकसान पोहोचविणारा आहे. या ठिकाणी ही बाब देखील नजरेआड करता येणार की मागील ५० वर्षापासून कोणीही रस्त्याची मागणी केलेली नाही. ईतर दोन पर्याय प्रतिवादी यांचेजवळ उपलब्ध आहेत. त्यामुळे सकृतदर्शनी केस ही वादीच्या बाजुची आहे. जर तात्तपुरता मनाई हुकुम नाकारला व दिनांक ०६/०६/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी झाली तर वादीच्या मिळकतीचे नुकसान होवून वादीची अपरिमीत हानी होण्याची शक्यता नाकराता येत नाही. तसेच, सोईस्कारतेचा तोल देखील वादीच्याच बाजुचा आहे. तात्तपुरता मनाई हुकुम मंजूर होण्यासाठीचे तिनही घटक वादीने सिध्द केले आहे. करीता मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर हाकारार्थी देवून मुद्दा क्र. ४ करीता खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

# <u>आदेश</u>

०१. निशाणी ०५ वरील वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी यांनी रा.मा.क्र.०२/बी.एन.डी–५६/२०२४–२५ मौजा किन्ही या प्रकरणात दिनांक ०६/०६/२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या कार्यवाहीला व अंमलबजावणीला प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत स्थगीती देण्यात येत आहे.

०३. अर्जाचा खर्च आपआपला सोसावा.

येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येते.

Digitally signed by CHHAYA RAMDAS UMREDKAR
Date: 2026.05.04 16:06:19 +0530

दिनांक– ०४/०५/२०२६

**(श्रीमती सी.आर. उमरेडकर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
दारव्हा, जि. यवतमाळ.